(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

[२०१८] १३ एस.सी.आर. ९२०

डॉ. ध्रुवराम मुरलीधर सोनार

विरूद्ध

महाराष्ट्र राज्य व इतर

(फौजदारी अपील क्र. १४४३/२०१८)

२२ नोव्हेंबर २०१८

[न्या. ए. के. सिकरी व न्या. एस. अब्दुल नजीर]

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ *:* कलम ४८२ – अधिकाराचा वापर, व्याप्ती – चर्चा करण्यात आली.

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३*:* कलम ४८२ - कार्यवाही रद्दबातल करणे - प्रथम माहिती अहवाल, अपीलकर्ता आणि सहआरोपी यांच्याविरोधात, भादंसं कलम ३७६(२)(बी), ४२० सह कलम ३४ आणि अजा / अज अधिनियमाचे कलम ३(१)(एक्स) अंतर्गत दाखल करण्यात आला - अपीलकर्ता-आरोपी क्र. १ हा एक सरकारी डॉक्टर होता तर तक्रारदार ही त्याच आस्थापनेत परिचारिका होती - तक्रारदाराचे असे म्हणणे होते की, ती

अपीलकर्त्याच्या प्रेमात पडलेली होती आणि ती विधवा असल्याने तिला जोडीदाराची गरज होती - ते, कधी तिच्या घरी तर कधी अपीलकर्त्याच्या घरी एकत्र राहत होते - ते, बऱ्याच काळापासून एकमेकांशी नातेसंबंध ठेवून होते आणि त्यांनी एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेतला आणि अपीलकर्त्याने तिला असे वचन दिले होते की तो तिच्याशी विवाह करेल - तथापि, जेव्हा तिला समजले की,अपीलकर्त्याने दुसऱ्या महिलेशी विवाह केला आहे तेव्हा तिने एफआयआर/प्रमाअ दाखल केला - अपीलकर्त्याने एफआयआर/प्रमाअ रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली - उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली - अपील दाखल करण्यावर, निर्णय दिला कि: तक्रारदाराचे असे म्हणणे नव्हते की, अपीलकर्त्याने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केलेला होता - पक्षकारांदरम्यानचे मान्य करण्यात आलेले संमतीपूर्वक शारीरिक संबंध हे, भादंसं कलम ३७६ अंतर्गत असलेला गुन्हा ठरणार नाही - तक्रारदाराच्या वतीने तेथे एक मूक संमती होती आणि तिच्याद्वारे देण्यात आलेली मूक संमती ही तिच्या मनात निर्माण झालेल्या गैरसमजुतीचा परिणाम नव्हती - जरी तक्रारीत करण्यात आलेले आरोपांना त्यांच्या दृश्य मूल्यावर घेण्यात आले आणि त्यांच्या पूर्णतेत स्वीकारण्यात आले तरीही, ते, अपीलकर्त्याविरोधात कोणतेही प्रकरण सिद्ध करणार नाहीत - शिवाय, एफआयआर/प्रमाअ मध्ये भादंसं कलम ४२० किंवा अजा/अज अधिनियमाचे कलम ३(१)(एक्स) अन्वये अपीलकर्त्याद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही चुकीच्या कृत्याचा कुठेही उल्लेख नाही - म्हणूनच, उच्च न्यायालय हे, फौजदारी प्रक्रिया संहिता

कलम ४८३ अंतर्गत अपीलकर्त्याद्वारे दाखल करण्यात आलेल्या याचिकेला नामंजूर करण्यात न्याय्य नव्हते - एफआयआर/प्रमाअ रद्दबातल करण्यात आला - दंड संहिता, १८६० -, कलम ३७६(१)(बी), ४२० सह कलम ३४ - अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ - कलम ३(१)(एक्स).

<u>अपील मंजूर करीत न्यायालयाने,</u>

<u>निर्णय दिला की</u> ... १. ही बाब सर्वमान्य आहे की, फौ.प्र.सं. कलम ४८२ अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर हा अपवाद आहे आणि तो नियम नाही. या कलमानुसार, उच्च न्यायालयाला संहितेअंतर्गत कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करणे किंवा कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखणे किंवा इतःपर न्यायाचे उद्दिष्ट साध्य करणे या करिता आवश्यक राहतील असे आदेश देण्याचे अंगभूत अधिकार आहेत. परंतु, "कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर" किंवा "न्यायाची उद्दिष्टे साध्य करणे" या संज्ञा, उच्च न्यायालयाला अमर्याद अधिकार प्रदान करीत नाहीत आणि कायद्याच्या प्रक्रियेचा अभिकथित गैरवापर किंवा न्यायाची उद्दिष्टे साध्य करणे या बाबी प्रक्रियात्मक कायद्यांचा समावेश असलेल्या कायद्यानुसार केवळ, अन्यथा नाही, शक्य असतील. [परिच्छेद ८] [९२६-बी-सी]

हरयाणा राज्य आणि इतर विरुद्ध भजनलाल आणि इतर, **१९९२ पुरवणी (१)**

एससीसी ३३५: [१९९०] ३ पुरवणी एससीआर २५९; राजेश बजाज विरुद्ध एनसीटी ऑफ दिल्ली राज्य आणि इतर, **(१९९९) ३ एससीसी २५९ : [१९९९] १ एससीआर १०१२;** कर्नाटक राज्य विरुद्ध एम. देवेंद्रप्पा आणि अन्य एक, **(२००२) ३ एससीसी ८९ : [२००२] १ एससीआर २७५;** विनीत कुमार आणि इतर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि अन्य एक **(२०१७) १३ एससीसी ३६९ : [२०१७] ६ एससीआर ९२२** - या प्रकरणांवर भिस्त ठेवली.

२. कार्यवाही रद्दबातल करण्याकरिता, एखाद्या गुन्ह्याची दंडाधिकाऱ्याद्वारे दखल घेण्याच्या तथ्याचे बारकाईने विश्लेषण गरजेचे नाही. साक्षीपुराव्याचे मूल्यमापन हे सुद्धा अंगभूत अधिकारांचा वापर करण्याकरिता, अनुज्ञेय नाही. तक्रारीत नमूद करण्यात आलेले आरोप जर, ज्या गुन्ह्याची दखल घेण्यात आलेली आहे तो जर गुन्हा ठरत नसेल तर, अंगभूत अधिकारांचा वापर करीत तो रद्दबातल करणे ही बाब उच्च न्यायालयाकरिता अनुज्ञेय आहे. [परिच्छेद १२][९२८-जी]

३. कलम ३७६(२)(बी) हे, लोकसेवक म्हणून त्याच्या ताब्यात असणाऱ्या किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या लोकसेवकाच्या ताब्यात असणाऱ्या महिलेवर, त्याच्या कार्यालयीन स्थितीचा लाभ घेत एखाद्या लोकसेवकाद्वारे, करण्यात आलेल्या बलात्काराच्या गुन्ह्याकरिता शिक्षेची तरतूद करते. कलम ३७५ हे, बलात्काराच्या गुन्ह्याची व्याख्या करते आणि त्या गुन्ह्याची सहा वर्णने विहित करते. पहिला खंड तेथे

प्रचालन करतो जेथे स्त्रिया तिची संवेदना तिच्या नियंत्रणात ठेवते आणि म्हणून संमती देण्यास सक्षम असतात, परंतु हे कृत्य तिच्या इच्छेविरुद्ध करण्यात येते,आणि दुसरा खंड हा तेथे प्रचालन करतो जेथे, ते कृत्य तिच्या संमतीशिवाय करण्यात येते; तिसरा, चौथा आणि पाचवा खंड तेव्हा प्रचालन करतांत जेव्हा, संमती असते परंतु ती अशी एखादी संमती नसते जी गुन्हेगाराला क्षमा करते, कारण ती संमती, तिला किंवा जिच्यामध्ये ती हितसंबंधित असते त्या व्यक्तीला, मृत्यूच्या किंवा दुखापतीच्या भीतीमध्ये ठेवित, मिळविण्यात येते. "तिच्या 'इच्छे'विरुद्ध" या संज्ञेचा अर्थ असा होतो की, ते कृत्य त्या स्त्रीचा विरोध असूनसुद्धा निश्चितपणे करण्यात आलेले असावे. संमतीच्यासंबंधाने निष्कर्ष हा तेव्हाच काढता येणे शक्य आहे जेव्हा तो त्या प्रकरणाचा साक्षीपुरावा किंवा शक्यता यावर केवळ आधारित आहे. "संमती" ही, विचारविनिमय यासह असलेली अशी तर्काची एक कृती असल्याचे नमूद करण्यात येते. ते ज्याविरोधात तक्रार करण्यात आली ते कृत्य करण्याकरिता परवानगी देणे याकरिताची एखाद्या व्यक्तिच्या मनामधील सक्रिय इच्छा, दर्शविते. भादंसं कलम ९०, जरी, 'संमती' व्याख्यांकित करीत नाही तरी ते "संमती" म्हणजे काय नाही या बाबीचे वर्णन करते. संमती ही व्यक्त किंवा अभिप्रेत अशी, जबरदस्तीने दिलेली किंवा दिशाभूल केल्यामुळे दिलेली अशी, स्वेच्छेने किंवा फसवणुकीद्वारे प्राप्त केलेली अशी, असू शकते. संमती जर, तक्रारकर्त्याद्वारे तथ्यांच्या गैरसमजुतीअंतर्गत देण्यात येते तर ती कलुषित अशी असते. कलम ३७५ च्या प्रयोजनार्थ

असलेली संमती ही, स्वेच्छापूर्वक सहभागाला त्या कृत्याचे महत्त्व व नैतिक गुणवत्ता यांच्या ज्ञानावर आधारित बुद्धिमत्तेचा वापर केल्यानंतरच केवळ नाही, परंतु, प्रतिकार आणि संमती या दोहोंमधील एका पर्यायाचा पूर्णपणे वापर केल्यानंतरसुद्धा आवश्यक करते. संमती तेथे होती की नाही ही बाब सर्व संबंधित परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केल्यावरच केवळ, ठरविण्यात यावयाची अशी बाब आहे. [परिच्छेद १३, १४, १५][९२८-एच; ९२९-ए, डी-ई; ९३०-ए-बी]

उदय विरुद्ध कर्नाटक राज्य **(२००३) ४ एससीसी ४६ : [२००३] २ एससीआर २३१;** दिलीप सिंह उर्फ दिलीप कुमार विरुद्ध बिहार राज्य **(२००५) १ एससीसी ८८ : [२००४] ५ पुरवणी एससीआर ९०९ ;** दीपक गुलाटी विरुद्ध हरियाणा राज्य **(२०१३) ७ एससीसी ६७५ : [२०१३] ६ एससीआर ५४४ -** या प्रकरणांवर भिस्त ठेवली.

४. बलात्कार आणि सहमतीपूर्वक समागम या दोहोंमध्ये स्पष्ट भिन्नत्त्व आहे. न्यायालयाने, अशा प्रकरणांमध्ये असे फार काळजीपूर्वक तपासणे अत्यावश्यक आहे की, तक्रारदाराला पीडितेशी प्रत्यक्षात विवाह करायचा होता की त्याचा अप्रामाणिक असा प्रेरक हेतू होता आणि आपली वासना पूर्ण करणे या परिणामामध्ये केवळ त्याने खोटे वचन दिलेले होते कारण नंतरची बाब ही ठकवणूक किंवा फसवणूक या बाबीच्या कक्षेत येते. वचनाचा निव्वळ भंग आणि खोटे वचन पूर्ण न करणे या दोहोंत सुद्धा भिन्नत्त्व आहे. आरोपीने जर

फिर्यादी स्त्रीला लैंगिक कृत्यामध्ये सहभागी होण्यासाठी फूस लावण्याच्या एकमेव हेतूने वचन दिलेले नसेल तर, असे एखादे कृत्य बलात्कार होणार नाही. असे एखादे प्रकरण असू शकते जेथे, फिर्यादी स्त्री ही, आरोपीकरिता असलेले तिचे प्रेम आणि उत्कटता यामुळे,आणि आरोपीने निर्माण केलेल्या गैरसमजुतीखातर एकमेवरित्या नव्हे, लैंगिक समागम करणे यास तयार होते किंवा जेथे, आरोपी हा ज्याचा त्याला अंदाज येऊ शकला नव्हता किंवा ज्या त्याच्या नियंत्रणाबाहेरील होत्या, अशा परिस्थितींमुळे, तिच्यासोबत विवाह करण्यास तसे करण्यास त्याचा प्रत्येक हेतू असतांनासुद्धा अक्षम होता. अशा प्रकरणांना वेगळ्या प्रकारेच हाताळले पाहिजे. आरोपीचा जर काही अप्रामाणिक उद्देश होता आणि जर त्याचे छुपे प्रेरक हेतू होते तर, ते बलात्काराचे स्पष्ट प्रकरण आहे. दोन्ही पक्षकारांदरम्यान मान्य करण्यात आलेले सहमतीपूर्वक शारीरिक संबंध हे भादंसं कलम ३७६ अन्वये, गुन्हा ठरत नाही. [परिच्छेद २०][९३३-जी-एच; ९३४-ए-सी]

५. प्रस्तुत प्रकरणात, अपीलकर्ता हा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होता आणि तक्रारदार ही त्याच आरोग्य केंद्रात सहाय्यक परिचारिका म्हणून कार्यरत होती आणि ती एक विधवा आहे. तिने असा आरोप केला आहे की, अपीलकर्त्याने तिला अशी माहिती दिली की, तो एक विवाहित पुरुष आहे आणि त्याचे त्याच्या पत्नीशी मतभेद आहेत. स्वीकृतपणे, ते वेगवेगळ्या समाजाचे आहेत. असाही आरोप करण्यात आला आहे की, आरोपीला/अपीलकर्त्याला, त्यांच्या विवाहाची नोंदणी

करवून घेणे करिता, एका महिन्याच्या वेळेची आवश्यकता होती. तक्रारदार पुढे असे नमूद करते की, ती अपीलकर्त्याच्या प्रेमात पडली होती आणि ती विधवा असल्याने तिला साथीदाराची आवश्यकता होती. ते, कधी तिच्या घरी तर कधी अपीलकर्त्याच्या घरी असे, एकत्र राहत होते. ते, बऱ्याच काळापासून एकमेकांशी नातेसंबंध ठेवून होते आणि त्यांनी एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेतला. हे देखील स्पष्ट आहे की, ते बऱ्याच काळाकरिता अश्याप्रकारे एकत्र राहत होते. जेव्हा तिला असे समजले की, अपीलकर्त्याने इतर कुणा महिलेशी विवाह केलेला आहे तेव्हा तिने तक्रार दाखल केली. तिचे असे म्हणणे नाही की, तक्रारदाराने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केलेला आहे. तिने, ज्या घडलेल्या होत्या अशा घडामोडींवर बुद्धीचा सक्रीय वापर करून, जाणीवपूर्वक निर्णय घेतला होता. कुठलाही मानसिक दबाव टाकण्यात आल्याच्या परिस्थितीत एक निष्क्रिय शरणागती पत्करण्याचे हे एखादे प्रकरण नाही आणि तिथे एक मूक संमती होती आणि तिच्याद्वारे देण्यात आलेली मूक संमती ही तिच्या मनात निर्माण झालेल्या गैरसमजुतीचा परिणाम नव्हती. जरी तक्रारीत करण्यात आलेले आरोपांना त्यांच्या दृश्य मूल्यावर घेण्यात आले आणि त्यांच्या पूर्णतेत स्वीकारण्यात आले तरीही ते, अपीलकर्त्याविरोधात कोणतेही प्रकरण सिद्ध करणार नाही. तसेच, तक्रारदार ही, बलात्कार झाल्याचे प्रथमदर्शनी दर्शविण्यात अपयशी ठरलेली आहे, या कारणाने, कलम ३७६ (२) (बी) अन्वये दाखल केलेली तक्रार विचार करण्यायोग्य नाही. शिवाय, एफआयआर/प्रमाअ हा भादंसं कलम ४२० किंवा अजा/अज

अधिनियमाचे कलम ३(१)(एक्स) अन्वये अपीलकर्त्याद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही चुकीच्या कृत्याचा कुठेही उल्लेख करीत नाही. म्हणूनच, उच्च न्यायालय हे फौ.प्र.सं कलम ४८२ अंतर्गत अपीलकर्त्याद्वारे दाखल करण्यात आलेल्या याचिका नामंजूर करण्यात, न्याय्य नव्हते. [परि. २१, २२][९३४-डी-एच; ९३५-ए-बी]

विधी निर्णय संदर्भ

[१९९०]	३ पुरवणी एससीआर २५९	भिस्त ठेवली	परिच्छेद ९
[१९९९]	१ एससीआर १०१२	भिस्त ठेवली	परिच्छेद १०
[२००२]	१ एससीआर २७५	भिस्त ठेवली	परिच्छेद ११
[२०१७]	६ एससीआर ९२२	भिस्त ठेवली	परिच्छेद १२
[२००३]	२ एससीआर २३१	भिस्त ठेवली	परिच्छेद १६
[२००४]	५ पुरवणी एससीआर ९०९	भिस्त ठेवली	परिच्छेद १७
[२०१३]	६ एससीआर ५४४	भिस्त ठेवली	परिच्छेद १८

फौजदारी अपिलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्र. १४४३/२०१८.

मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठचे, फौजदारी अपील क्र. २०१२ ची

३५९०/२०१२ मधील दिनांक ०२.०७.२०१८ चे न्यायनिर्णय व आदेशापासून.

जयंत सूद, वरिष्ठ वकील , संदीप एस. देशमुख, वसीम सिद्दीकी, संदीप सुधाकर देशमुख, अपीलकर्त्याचे वकील .

मिस. दिपा एम. कुलकर्णी, निशांत आर. काटनेश्वरकर,उत्तरवादींचे वकील .

<u>न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. एस. अब्दुल नजीर यांच्याद्वारे देण्यात आला.</u>

१. अनुमती दिली.

२. हे अपील, फौजदारी अर्ज क्रमांक ३५९० /२०१२ मधील दिनांक ०२.०७.२०१८ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशाविरोधात आहे, ज्याअन्वये, मुंबई उच्च न्यायालयाने (औरंगाबाद येथील खंडपीठ), भारतीय दंड संहिता, १८६० (थोडक्यात 'भादंसं') कलम ३७६ (२)(बी), ४२०, सह कलम ३४ तसेच अनुसूचित जाती व जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ (थोडक्यात 'अजा/अज अधिनियम') कलम ३(१)(एक्स) अंतर्गत दंडनीय असलेल्या गुन्ह्यांसाठी, म्हसवड पोलिस ठाणे, जिल्हा नंदुरबार येथे दाखल केलेला प्रथम माहिती अहवाल क्र. ५९/२००० आणि न्यायदंडाधिकारी, प्र. व. शहादा, नंदुरबार जिल्हा यांच्या न्यायालयात, दाखल करण्यात आलेले दोषारोपपत्र, यांना रद्दबातल करण्याकरिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (थोडक्यात 'फौ.प्र.सं.') कलम ४८२ अन्वये याचिकाकर्त्याद्वारे दाखल करण्यात आलेला

अर्ज फेटाळला.

३. अपीलकर्ता हा तक्रारदार / उत्तरवादी क्रमांक ४ च्या वतीने नोंदणी करण्यात आलेल्या उपरोल्लेखित एफआयआर/प्रमाअ मधील, आरोपी क्र. १ आहे. संबंधित वेळी, अपीलकर्ता हा, तोरणमाळ, धडगाव तालुका, नंदुरबार जिल्हा येथील, प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होता तर, तक्रारदार ही त्याच आस्थापनेत एक सहाय्यक परिचारिका म्हणून कार्यरत होती. एफआयआर/प्रमाअमध्ये तक्रारदाराद्वारे करण्यात आलेले आरोप थोडक्यात असे आहेत की, तिचा पती दि. ०५.११.१९९७ रोजी निधन पावला आणि त्याच्या पश्चात त्याची पत्नी म्हणजे तक्रारदार आणि दोन मुले त्याचे वारस आहेत. या काळादरम्यान, अपीलकर्त्याने तिला अशी माहिती दिली की, तो व त्याची पत्नी यांच्यात काही मतभेद निर्माण झालेले आहेत, आणि म्हणून, तो, त्याच्या पत्नीला घटस्फोट देण्याची योजना करीत आहे. तसेच, अपिलकर्त्याने तक्रारदाराला अशी माहिती दिली की, ते वेगवेगळ्या समाजाचे आहेत यामुळे, विवाहाची नोंदणी करण्याकरिता एक महिना आवश्यक आहे. म्हणून, तिने अपिलकर्त्यासोबत त्याच्या सरकारी निवासस्थानात राहणे सुरु केले. एफआयआर/प्रमाअ मध्ये पुढे असे नमूद आहे की, ती, अपीलकर्त्याच्या प्रेमात पडलेली होती आणि ती विधवा असल्याकारणाने तिला जोडीदाराची आवश्यकता होती. त्यामुळे, जणूकाही ते पती व पत्नी होते याप्रमाणे त्यांनी एकत्रित राहणे सुरु केले. ते, कधी तिच्या घरी तर कधी अपीलकर्त्याच्या घरी एकत्र राहत

होते. अपीलकर्ता, जणूकाही त्याने तिच्याशी विवाह केलेला आहे याप्रमाणे वागला, आणि त्याने, तिच्यासोबत शारीरिक संबंध कायम ठेवलेले आहेत. मात्र, आश्वासन(वचन) दिल्याप्रमाणे, तिच्याशी विवाह करण्यात तो अपयशी ठरलेला आहे. अशी परिस्थिती असताना, त्याचा भाऊ, म्हणजेच आरोपी क्र. २ हा त्याने तिच्याशी विवाह केला असल्याचा दावा करतो. त्यानंतर, सन २००० मध्ये, तक्रारदाराला इतर कोणत्यातरी महिलेसोबतच्या अपीलकर्त्याच्या विवाहाची माहिती सहआरोपी कडून मिळाली. त्यामुळे, तिने उपरोल्लेखित तक्रार दाखल केली आणि अपीलकर्ता आणि सहआरोपी यांच्याविरोधात , दिनांक ०६.१२.२००० च्या एफआयआर/प्रमाअ मध्ये नोंद घेण्यात आली.

४. तपास पूर्ण झाल्यानंतर, तपास यंत्रणेने दिनांक १४.०६.२००१ रोजी अंतिम अहवाल दाखल केला. अपीलकर्त्याने, एफआयआर/प्रमाअ आणि दोषारोपपत्र रद्दबातल करण्यासाठी, उच्च न्यायालयात कलम ४८२ अंतर्गत फौजदारी अर्ज दाखल केला. वर नमूद केल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाने दिनांक ०२.०७.२०१८ च्या आदेशाद्वारे फौजदारी याचिका फेटाळली .

५. अपीलकर्त्याचे विद्वान वकील यांचा असा युक्तिवाद आहे की, तात्काळ प्रकरणात तक्रारदाराद्वारे तिरकस प्रेरक हेतूने न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. फौजदारी कारवाई उघडपणे दुर्भावनापूर्ण हेतूने करण्यात आली आहे आणि ही कारवाई अंतस्थ हेतूने द्वेषमूलकरीत्या सुरू करण्यात आली आहे .

असा युक्तिवाद करण्यात आला की, तक्रारदार ही अपीलकर्त्याच्या भावासोबतच्या नातेसंबंधात गुंतलेली होती आणि अपीलकर्ता हा संबंधित क्षणी तिच्या सोबतच्या नातेसंबंधात नव्हता. प्रत्यक्षात, अपीलकर्त्याचा भाऊ आणि तक्रारदार यांच्यादरम्यान विवाह विधिपूर्वक संपन्न झाला होता. तक्रारदार ही, अपीलकर्त्याला, सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने, खोटीनाटी बदनामी करण्याची धमकी देत त्रास देत होती. असा युक्तिवाद करण्यात आला की, तक्रारीत करण्यात आलेले संपूर्ण आरोप जरी त्यांच्या दृश्य मूल्यावर घेण्यात आले आणि त्यांच्या पूर्णतेत स्वीकारण्यात आले तरीही, असे आरोप हे कोणताही गुन्हा सिद्ध करीत नाहीत.

६. दुसरीकडे, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकील यांनी या आक्षेपित आदेशाला न्यायोचित ठरवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

७. आम्ही न्यायालयासमोर विद्वान वकिलांद्वारे करण्यात आलेल्या युक्तिवादांचा काळजीपूर्वक विचार केलेला आहे आणि अभिलेखावर ठेवण्यात आलेल्या साहित्याची पडताळणी केली आहे.

८. ही बाब सर्वमान्य आहे की, फौ.प्र.सं. कलम ४८२ अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर हा अपवाद आहे आणि तो नियम नाही. या कलमानुसार, उच्च न्यायालयाला, संहितेअंतर्गत कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करणे किंवा कोणत्याही

न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखणे किंवा इतःपर न्यायाचे उद्दिष्ट साध्य करणे याकरिता आवश्यक असतील असे आदेश देण्याचे अंगभूत अधिकार आहेत. परंतु, "कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर" किंवा "न्यायाची उद्दिष्टे साध्य करणे" या संज्ञा, उच्च न्यायालयाला अमर्याद अधिकार प्रदान करीत नाहीत आणि कायद्याच्या प्रक्रियेचा अभिकथित गैरवापर किंवा न्यायाची उद्दिष्टे साध्य करणे या बाबी प्रक्रियात्मक कायद्यांचा समावेश असलेल्या कायद्यानुसार केवळ, अन्यथा नाही, शक्य असतील.

९. या न्यायालयाने, **हरियाणा राज्य आणि इतर विरुद्ध भजनलाल आणि इतर १९९२ पुरवणी (१) एससीसी ३३५,** या प्रकरणामध्ये, फौ.प्र.सं. कलम ४८२ ची व्याप्ती आणि कक्षा यांचा सविस्तररीत्या विचार केलेला आहे. फौ.प्र.सं. कलम ४८२ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर जेथे करता येईल अशा प्रकरणांचे सात प्रकार गणण्यात आलेले आहेत. परिच्छेद १०२ खालीलप्रमाणे आहे:

> "१०२. प्रकरण २४ अंतर्गत संहितेच्या विविध संबद्ध तरतुदींचा अर्थ लावणे आणि अनुच्छेद २२६ अंतर्गत असाधारण अधिकाराचा वापर करण्याच्या संबंधाने किंवा संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत अंगभूत अधिकारांचा वापर करण्याच्या संबंधाने, ज्यांना आम्ही संकलित केलेले आहे आणि वर पुनःरुद्धृत केलेले आहे अशा निर्णयांमध्ये या न्यायालयाद्वारे मांडण्यात आलेली कायद्याची तत्त्वे, यांच्या पार्श्वभूमीवर, आम्ही, उदाहरणादाखल प्रकरणांचे असे पुढील संवर्ग देतो, ज्या

संवर्गांमध्ये,अशा अधिकारांचा वापर एकतर कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा दुरुपयोग प्रतिबंधित करणे किंवा, अन्यथा, न्यायाचे उद्दिष्ट साध्य करणे, यांकरिता करणे शक्य होईल, मात्र, कोणतीही अचूक, स्पष्टपणे परिभाषित केलेली आणि पुरेशी मार्गी लावलेली व लवचिक नसलेली, मार्गदर्शक तत्त्वे किंवा कठोर सूत्रे, मांडणे तसेच ज्यामध्ये अशा अधिकाराचा वापर करण्यात यावा अशा असंख्य प्रकारच्या प्रकरणांची विस्तृत यादी देणे, शक्य नाही.

(१) जेथे प्रथम माहिती अहवाल किंवा तक्रार यांमध्ये करण्यात आलेले आरोप त्यांच्या दृश्य मूल्यावर घेण्यात आले आणि पूर्णपणे स्वीकारण्यात आले, तरीही प्रथमदर्शनी एकतर कोणताही गुन्हा ठरत नाही किंवा आरोपीविरोधात कोणतेही प्रकरण सिद्ध होत नाही.

(२) जेथे प्रथम माहिती अहवाल आणि प्रमाअ/प्रमाअ यांसोबत जोडण्यात आलेली, जर काही असल्यास, इतर सामग्री/पुरावे, यांच्यामधील आरोप हे, जेणेकरुन, संहितेच्या कलम १५६ (१) अंतर्गत पोलीस अधिकाऱ्याद्वारे तपास करण्याला, न्यायोचित ठरवेल या दृष्टिने, मात्र, संहितेच्या कलम १५५(२) च्या कक्षेत दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाअंतर्गत करावयाच्या तपासाचा अपवाद करीत दखलपात्र गुन्हा उघड करीत नाहीत.

(३) जेथे एफआयआर/प्रमाअ किंवा तक्रार यांमध्ये करण्यात आलेले अविरोध आरोप आणि त्याच्या समर्थनार्थ गोळा केलेले पुरावे कोणताही गुन्हा केल्याचे उघड करत नाहीत आणि आरोपीविरोधात प्रकरण सिद्ध करीत नाहीत.

(४) जेथे, एफआयआर/प्रमाअ मधील आरोप दखलपात्र गुन्हा ठरत नाहीत तर केवळ अदखलपात्र गुन्हा ठरतात, तेथे संहितेच्या कलम १५५(२) नुसार कल्पिलेले असल्याप्रमाणे, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय, कोणताही तपास पोलिस अधिकाऱ्याद्वारे करण्यांस परवानगी नाही.

(५) जिथे एफआयआर/प्रमाअ किंवा तक्रार यांमध्ये केलेले आरोप एव्हढे तर्कविसंगत आणि स्वाभाविकपणे असंभाव्य आहेत ज्याच्या आधारे कोणतीही विवेकी व्यक्ती कधीही या न्याय्य निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही की आरोपींविरोधात कारवाई करण्यासाठी पुरेसा आधार आहे.

(६) जेथे संहिता किंवा संबंधित अधिनियम (ज्याअंतर्गत फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली आहे) यांमध्ये, कार्यवाही सुरू करणे वा ती सुरु ठेवणे याकरिता, स्पष्ट कायदेशीर अडथळा तेथे आहे आणि / किंवा जेथे संहिता किंवा संबंधित अधिनियम यांमध्ये, पीडित पक्षकाराच्या तक्रारीकरिता प्रभावी निवारण देणारी, एखादी विशिष्ट तरतूद आहे.

(७) जेथे गुन्हेगारी कारवाई उघडपणे दुर्भावनेने ग्रस्त आहे, आणि/किंवा जेथे ही कारवाई, आरोपीवर सूड उगवण्याच्या अंतस्थ हेतूने आणि खाजगी आणि वैयक्तिक वैमनस्य यामुळे त्याला त्रास देण्याच्या हेतूपूर्वक, दुर्भावनापूर्वक सुरू करण्यात येते.

१०. **राजेश बजाज विरुद्ध स्टेट एनसीटी ऑफ दिल्ली आणि इतर, (१९९९) ३ एससीसी २५९,** या प्रकरणामध्ये, या न्यायालयाने असे नमूद केले की, असे आवश्यक नाही की, तक्रारदाराने, तो आरोप करीत असलेल्या गुन्ह्यातील सर्व घटकांना त्याच्या तक्रारीच्या मुख्य भागात, शब्दशः पुनरुत्पादित करावे. तक्रारीत जर गुन्ह्याचा तथ्यात्मक पाया घालण्यात आलेला असेल, तर, केवळ एक किंवा दोन घटक तपशिलांसहित नमूद करण्यात आलेले नाहीत, निव्वळ या कारणास्तव, न्यायालयाने तपासाच्या टप्प्यादरम्यान फौजदारी कारवाई रद्दबातल करण्याची घाई करू नये.

११. कर्नाटक राज्य विरुद्ध एम. देवेंद्रप्पा आणि अन्य एक, (२००२) ३ एससीसी ८९, या प्रकरणामध्ये असे नमूद करण्यात आले की, फौ.प्र.सं. कलम ४८२ अंतर्गत अधिकारांचा वापर करीत असताना, न्यायालय हे, अपील किंवा पुनरावलोकन न्यायालय म्हणून कार्य करत नाही. या कलमाअंतर्गत, अंगभूत अधिकारक्षेत्र हे जरी व्यापक असले तरी, त्याचा वापर, फार कमी वेळा, काळजीपूर्वक आणि सावधगिरीने, तसेच, तेव्हाच जेव्हा, असा वापर हा, त्या कलमात स्वतःमध्ये विशेषत: नमूद करण्यात आलेल्या

कसोट्यांद्वारे, करण्यात येणे अत्यावश्यक आहे. पुढे खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले :-

"जे अन्यायात परिणामित होईल आणि न्यायाला चालना मिळण्यास प्रतिबंध करेल अशा कोणत्याही कृतीला परवानगी देणे, ही बाब न्यायालयाच्या प्रक्रियेचा एक गैरवापर ठरेल. आपल्या अधिकारांचा वापर करण्यात, न्यायालय हे, अशी कोणतीही कार्यवाही रद्दबातल करण्यात न्यायोचित राहील, जर न्यायालयाला असे आढळून येते की ती सुरू करणे/चालू ठेवणे म्हणजे न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर करणे ठरते किंवा या कार्यवाही रद्दबातल करणे ही बाब, अन्यथा, न्यायाचे उद्दिष्ट साध्य करेल. जेव्हा तक्रारीद्वारे कोणताही गुन्हा उघड होत नाही, तेव्हा, न्यायालय तथ्याचा प्रश्न तपासू शकते. जेव्हा एखादी तक्रार रद्दबातल करण्याची मागणी केली जाते तेव्हा, तक्रारदाराने काय आरोप केलेला आहे याचे मूल्यमापन करणे आणि आरोप जरी पूर्णपणे स्वीकारण्यात आले तरीसुद्धा कोणताही गुन्हा घडलेला दिसत आहे का ? याकरिता, ती सामग्री पडताळणे अनुज्ञेय आहे."

१२. नुकतेच, **विनीत कुमार आणि इतर विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि अन्य एक (२०१७) १३ एससीसी ३६९,** या प्रकरणामध्ये, या न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवलेले आहे:

"फौप्रसं कलम ४८२ अंतर्गत उच्च न्यायालयाला दिलेले अंगभूत अधिकार हे,

न्यायाच्या उन्नतीचे प्रयोजन आणि साध्य यांच्या अनुषंगाने आहे. न्यायालयाच्या गंभीर प्रक्रियेचा जर एखाद्या व्यक्तीने काही तिरकस हेतूने गैरवापर करण्याचा प्रयत्न केला तर, न्यायालयाने अशा प्रयत्नाला अगदी सुरवातीलाच हाणून पाडणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रिया ही एक गंभीर प्रक्रिया आहे, ज्याचे रूपांतर, दडपशाही किंवा छळवणूक याकरिताच्या साधनात होऊ देण्यास मान्यता देणे शक्य नाही. जेव्हा असे दर्शविणारी सामग्री असते की, फौजदारी कारवाई उघडपणे दुर्भावनापूर्ण हेतूने करण्यात आली आहे आणि ही कारवाई अंतस्थ हेतूने द्वेषमूलकरीत्या सुरू करण्यात आली आहे तेव्हा, उच्च न्यायालय फौप्रसं कलम ४८२ अंतर्गत आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करीत कारवाई रद्द करण्यास, मागेपुढे पाहणार नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे एक योग्य प्रकरण आहे जिथे उच्च न्यायालयाने फौप्रसं कलम ४८२ अंतर्गत आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करायलाच हवा होता आणि फौजदारी कारवाई रद्दबातल करायलाच हवी होती.

ही बाब स्पष्ट आहे की, कार्यवाही रद्दबातल करण्याकरिता , एखाद्या गुन्ह्याची दंडाधिकाऱ्याद्वारे दखल घेण्याच्या तथ्याचे बारकाईने विश्लेषण गरजेचे नाही. साक्षीपुराव्याचे मूल्यमापन हे सुद्धा, वापर करण्याकरिता अनुज्ञेय नाही. तक्रारीत नमूद करण्यात आलेले आरोप जर, ज्या गुन्ह्याची दखल घेण्यात आलेली आहे तो गुन्हा ठरत नसेल तर, अंगभूत अधिकारांचा वापर करीत त्यास रद्दबातल करणे ही बाब उच्च

न्यायालयाकरिता अनुज्ञेय आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणात, एफआयआर/प्रमाअ, अपीलकर्ता आणि सहआरोपी यांच्याविरोधात, भादंसं कलम ३४ सह कलम ३७६(२)(बी), ४२० अंतर्गत आणि अजा/अज अधिनियमाचे कलम ३(१)(एक्स), अंतर्गत नोंदविण्यात आला होता. कलम ३७६(२)(बी) हे, लोकसेवक म्हणून त्याच्या ताब्यात असणाऱ्या किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या लोकसेवकाच्या ताब्यात असणाऱ्या महिलेवर, त्याच्या कार्यालयीन स्थितीचा लाभ घेत एखाद्या लोकसेवकाद्वारे, करण्यात आलेल्या बलात्काराच्या गुन्ह्याकरिता, शिक्षेची तरतूद करते. संबंधित कालावधीतील सदर तरतूद खालीलप्रमाणे होती:-

३७६. बलात्कारासाठी शिक्षा:-

(१) .....

२. जो कोणीही,

(ए) .....

(बी) लोकसेवक असल्याने, त्याच्या कार्यालयीन स्थितीचा फायदा घेतो आणि लोकसेवक म्हणून त्याच्या ताब्यात असणाऱ्या किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या लोकसेवकाच्या ताब्यात असणाऱ्या, महिलेवर, बलात्कार करतो; किंवा

(सी) ते (जी) .....

दहा वर्षांपेक्षा कमी नाही परंतु जी जीवनकालापर्यंत असू शकते अशा कालावधीकरिता सश्रम कारावासाची शिक्षा करण्यात येईल आणि तो दंडासही पात्र असेल .

१४. कलम ३७५ बलात्काराच्या गुन्ह्याची व्याख्या करते आणि त्या गुन्ह्याची सहा वर्णने, विहित करते. पहिला खंड तेथे प्रचालन करतो, जेथे, स्त्रिया तिच्या संवेदना तिच्या नियंत्रणात ठेवते आणि म्हणून, संमती देण्यास सक्षम असतात, परंतु हे कृत्य तिच्या इच्छेविरुद्ध करण्यात येते, आणि दुसरा खंड हा, तेथे प्रचालन करतो जेथे, ते कृत्य तिच्या संमतीशिवाय करण्यात येते; तिसरा, चौथा आणि पाचवा खंड तेव्हा प्रचालन करतांत जेव्हा, संमती असते परंतु ती अशी एखादी संमती नसते जी गुन्हेगाराला क्षमा करते, कारण ती संमती, तिला किंवा जिच्यामध्ये ती हितसंबंधित असते त्या व्यक्तीला, मृत्यूच्या किंवा दुखापतीच्या भीतीमध्ये ठेवित मिळविण्यात येते. "तिच्या 'इच्छे'विरुद्ध" या संज्ञेचा अर्थ असा होतो की, ते कृत्य त्या स्त्रीचा विरोध असूनसुद्धा निश्चितपणे करण्यात आलेले असावे. संमतीच्यासंबंधाने निष्कर्ष हा तेव्हाच काढता येणे शक्य आहे जेव्हा तो त्या प्रकरणाचा साक्षीपुरावा किंवा शक्यता यावर केवळ आधारित आहे. "संमती" ही, विचारविनिमयास जोडून असलेली अशी तर्काची एक कृती असल्याचे नमूद करण्यात येते. ते, ज्याविरोधात तक्रार करण्यात आली ते कृत्य करण्याकरिता परवानगी देणे याकरिताची एखाद्या व्यक्तिच्या मनामधील सक्रिय इच्छा दर्शविते.

१५. भादंसं कलम ९० भीती किंवा गैरसमजूत यांअंतर्गत देण्यात आली असे समजण्यात येणारी "संमती" व्याख्यांकित करते:-

"कलम ९०:

संमती भीती किंवा गैरसमजुतीखाली दिली गेली असे समजते - एखादी संमती ही, या संहितेच्या कोणत्याही कलमाद्वारे उद्देशित करण्यात आलेली अशी संमती नाही, जर ती संमती, इजा होण्याच्या भीतीने किंवा तथ्याच्या गैरसमजुतीखाली एखाद्या व्यक्तीद्वारे देण्यात आली आहे आणि जर, ते कृत्य करणारी व्यक्ति असे जाणते किंवा असा विश्वास ठेवण्यास तिला कारण आहे की, ती संमती, अशी भीती किंवा गैरसमजूत याच्या परिणामांती देण्यात आली होती"

अशाप्रकारे, भादंसं कलम ९०, जरी, "संमती" व्याख्यांकित करीत नाही तरी ते, "संमती" म्हणजे काय नाही, या बाबीचे वर्णन करते. संमती ही, व्यक्त किंवा अभिप्रेत अशी जबरदस्तीने दिलेली किंवा दिशाभूल केल्यामुळे दिलेली अशी स्वेच्छेने किंवा फसवणुकीद्वारे प्राप्त केलेली अशी, असू शकते. संमती जर, तक्रारदाराद्वारे तथ्यांच्या गैरसमजुतीअंतर्गत देण्यात येते तर, ती कलुषित अशी असते. कलम ३७५ च्या प्रयोजनार्थ असलेली संमती ही स्वेच्छापूर्वक सहभागाला त्या कृत्याचे महत्त्व व नैतिक गुणवत्ता याच्या ज्ञानावर आधारित बुद्धिमत्तेचा वापर केल्यानंतरच केवळ नाही, परंतु, प्रतिकार

आणि संमती या दोहोंमधील एका पर्यायाचा पूर्णपणे वापर केल्यानंतर सुद्धा आवश्यक करते. संमती तेथे होती की नाही ही बाब, सर्व संबंधित परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केल्यावरच केवळ, ठरविण्यात यावयाची, अशी आहे.

१६. **उदय विरुद्ध कर्नाटक राज्य (२००३) ४ एससीसी ४६,** या प्रकरणामध्ये हे न्यायालय एका प्रकरणाचा विचार करत होते जेथे, फिर्यादी स्त्री, सुमारे १९ वर्षीय, हिने आरोपीसोबत, ज्याच्यासोबत ती आत्यंतिक अशा प्रेमात होती, लैंगिक समागम करण्यास, तो नंतर कधी तिच्यासोबत विवाह करेल अशा वचनामुळे संमती दिलेली होती. फिर्यादी स्त्रीने आरोपीला भेटणे सुरु ठेवले आणि तिने अनेकदा लैंगिक समागम केला व ती गरोदर झाली. तिच्यासोबत विवाह करण्यातील आरोपीच्या अपयशानंतर, एक तक्रार दाखल करण्यात आली. असे नमूद करण्यात आले की, संमती ही तथ्याच्या गैरसमजुतीखाली देण्यात आली आहे, असे म्हणणे शक्य नाही. खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले :-

> "२१. म्हणून असे दिसून येते की, न्यायालयीन मतांमधील सहमती अशा दृष्टिकोनाच्या बाजूने आहे की, फिर्यादी स्त्री हिच्याद्वारे, ज्याच्यासोबत ती आत्यंतिक प्रेमात होती अशा व्यक्तिसोबत लैंगिक समागम करण्यास, तो नंतर कधी तिच्यासोबत विवाह करेल अशा आश्वासनामुळे देण्यात आलेली संमती, ही तथ्याच्या गैरसमजुतीखाली देण्यात आली आहे असे म्हणणे शक्य नाही. एक खोटे वचन हे, संहितेच्या अर्थांतर्गत असलेले एखादे तथ्य नाही. आम्ही या मताशी सहमत होण्यास

अनुकूल आहोत, परंतु, आम्ही हे देखील नमूद केले पाहिजे की, फिर्यादी स्त्री हिच्याद्वारे समागम करण्यास देण्यात आलेली संमती ही ऐच्छिक आहे किंवा ती एखाद्या तथ्याच्या गैरसमजुतीअंतर्गत देण्यात आलेली आहे, हे ठरविण्यासाठी कोणतेही सरळसोट सूत्र नाही. अंतिम विश्लेषणामध्ये, न्यायालयांद्वारे स्थापित करण्यात आलेल्या चाचण्या या एखाद्या संमतीच्या प्रश्नावर विचार करीत असतांनाच्या, न्यायालयीन मनाच्या दिशेने, खूपच झाले तर, मार्गदर्शन प्रदान करतात, परंतु, न्यायालयाने प्रत्येक प्रकरणात निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी आपल्यासमोरील पुरावे आणि आजूबाजूच्या परिस्थितीचा विचार केलाच पाहिजे, कारण प्रत्येक प्रकरणाला स्वतःची अशी विशिष्ट तथ्ये असतात जे संमती ऐच्छिक होती का किंवा ती तथ्याच्या गैरसमजुतीअंतर्गत देण्यात आलेली होती, या प्रश्नाला, प्रभावित करु शकतात. अशा दृष्टिकोनाला की, गुन्ह्याचा प्रत्येक घटक, संमतीचा अभाव हा त्यापैकीच एक असा आहे जो सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे, हे तथ्य लक्षात घेऊन साक्षीपुराव्याचे मूल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

२३. अशा प्रकरणांमध्ये जो दृष्टिकोन न्यायालयाने अवलंबिलाच पाहिजे त्यास लक्षात घेऊन, आम्ही आता अभिलेखावरील साक्षीपुराव्यांवर पुढे विचार करतो. या प्रकरणामध्ये, फिर्यादी स्त्री ही, महाविद्यालयात शिकणारी एक मोठी मुलगी होती.

ती, अपीलकर्त्यासोबतच्या आत्यंतिक प्रेमात होती. ती या तथ्याबाबत अवगत होती की, ते वेगवेगळ्या जातीचे होते याकारणाने, विवाह शक्य नव्हता. कोणत्याही परिस्थितीत, त्यांच्या विवाहाच्या प्रस्तावाला त्यांच्या कुटुंबाच्या सदस्यांद्वारे गंभीररीत्या विरोध होणारच होता. जेव्हा त्याने तिला पहिल्यांदा प्रस्ताव दिला तेव्हा तिने अपीलकर्त्यास तसे सांगितलेले असल्याचे, ती कबूल करते. ज्यास ती संमती देत होती त्या कृतीचे महत्त्व व नैतिक गुणवत्ता समजून घेण्याकरिता तिच्याकडे पुरेशी अशी बुद्धिमत्ता होती. त्याच कारणाने तिने तिला जोपर्यंत तसे करणे शक्य होते तोपर्यंत, ती बाब, एक गुपित म्हणून ठेवली. असे असूनही, तिने अपीलकर्त्याच्या प्रस्तावांना विरोध केला नाही आणि प्रत्यक्षात ती त्यांना बळी पडली. तिने, अशा प्रकारे प्रतिकार आणि संमती या दोन पर्यायांपैकी एकाची निवड मोकळेपणाने केली. तिला त्या कृत्याचे परिणाम माहिती असतीलच, विशेषत:, जेव्हा ती या तथ्याबाबत अवगत होती की, जातीच्या संबंधाने विचार झाल्यास त्यांचा विवाह कदाचित अजिबात होऊ शकणार नाही. या सर्व परिस्थिती आम्हाला या निष्कर्षापर्यंत घेऊन जातात की, तिने मोकळेपणाने, स्वेच्छेने आणि जाणीवपूर्वक, अपीलकर्त्यासोबत लैंगिक समागम करण्यास संमती दिली आणि तिची हि संमती तथ्याच्या कोणत्याही गैरसमजुतीच्या परिणामांती अशी नव्हती."

१७. **दिलीप सिंह उर्फ दिलीप कुमार विरुद्ध बिहार राज्य, (२००५) १ एससीसी**

८८, या प्रकरणामध्ये, न्यायालयाने, संमतीशी संबंधित खालील दोन प्रश्नांची रचना केली:-

(१) "ते एक, आरोपीद्वारे टाकण्यात आलेल्या मानसिक दबावाला किंवा दिलेल्या प्रलोभनांना सामोरे जाताना निष्क्रीयपणे शरण जाण्याचे, प्रकरण आहे का, किंवा, तो एक, ज्या कृत्यात तिला सामील होण्यास सांगण्यात आले होते त्याचे स्वरूप आणि परिणाम पूर्णपणे जाणत फिर्यादी स्त्रीच्या बाजूने जाणीवपूर्वक घेतलेला एक निर्णय होता का ?

(२) फिर्यादी स्त्रीद्वारे देण्यात आलेली मूक संमती ही, तिच्यासोबत विवाह करण्याच्या आरोपीच्या हेतूबद्दल तिच्या मनात निर्माण झालेल्या गैरसमजुतीचा परिणाम होती काय"?

या प्रकरणामध्ये, मुलीने पोलिसांत तक्रार दाखल केली की, ती आणि आरोपी हे शेजारी होते आणि ते एकमेकांच्या प्रेमात पडले होते. फेब्रुवारी १९८८ मध्ये एके दिवशी आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला आणि तो तिच्यासोबत विवाह करेल असे म्हणत त्याने नंतर तिचे सांत्वन केले. तिच्याशी विवाह करण्याच्या आरोपी द्वारे देण्यात आलेल्या वचनाच्या कारणामुळे, त्याच्यासोबत लैंगिक संबंध ठेवण्याच्या आरोपीच्या विनवण्यांना ती बळी पडली. ती गरोदर झाली त्यानंतर, तिने ही बाब, तिचे आई-वडिल यांच्याकडे उघड केली. त्यानंतरसुद्धा, आईवडिल व इतर नातेवाईक, जे, आरोपी त्या

मुलीशी विवाह करेल या भ्रमात होते, त्यांना त्याबाबत माहिती असतानाही जवळीक चालू राहिली, मात्र तिच्याशी विवाह करण्याचे आरोपीने टाळले आणि लग्नाचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी त्याच्या वडिलांनी त्याला गावाबाहेर नेले. मुलीच्या वडिलांनी वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी केलेले प्रयत्न, अयशस्वी झाले. त्यामुळे, काही काळ वाट पाहिल्यानंतर तिला तक्रार दाखल करावी लागली. या तथ्यात्मक पार्श्वभूमीवर, न्यायालयाने असे नमूद केले की, त्या मुलीने, घडलेल्या घटनांना सक्रिय पणे विचारात घेतल्यानंतर जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला होता. पुढे असे नमूद करण्यात आले कि, खूपच झाले तर, ते, विवाहाचे खोट्या वचनाचे एक प्रकरण असण्याऐवजी, विवाहाच्या वचनाच्या भंगाचे एक प्रकरण आहे, ज्याकरिता आरोपी हा दिवाणी कायद्यानुसार नुकसानभरपाईसाठी प्रथमदर्शनी जबाबदार आहे. नमूद करण्यात आले कि :-

> "उर्वरित प्रश्न हा, अभिलेखावरील पुराव्यांच्या आधारावर, असे वाजवीपणे मानणे शक्य आहे का की, लैंगिक समागमाकरिता तिला प्रवृत्त करण्याच्या फसव्या हेतूने आरोपीने विवाह करण्याचे खोटे वचन दिले, हा आहे. आम्हाला यासंबंधाने कोणताही संशय नाही की, आरोपीने तिच्याशी विवाह करण्याचे वचन निश्चित दिले होते, आणि ती बाब पीडित मुलीने त्याच्यासोबतच्या लैंगिक जवळिकीला होकार देण्याचे प्रमुख कारण होते. अ. सा. क्रमांक १२ देखील त्याच्याशी विवाह करण्यास खूप उत्सुक होती, कारण, तिने तसे विनिर्दिष्टपणे

सांगितले होते. परंतु, आम्हाला, अशा तर्कसंगत संशयापलीकडे निष्कर्ष काढणारा असा कोणताही पुरावा आढळत नाही की, आरोपीचा सुरुवातीपासूनच तिच्याशी विवाह करण्याचा अजिबात हेतू नव्हता आणि त्याने दिलेले वचन हे त्याच्या जाणिवेत खोटे होते. अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यावरून समोर आलेली कोणतीही परिस्थिती हे तथ्य सिद्ध करीत नाही. दुसरीकडे , अ. सा. क्रमांक १२ चे असे विधान की, "नंतर कधी", आरोपी तिच्याशी विवाह करण्यास तयार झाला, परंतु त्याचे वडील आणि इतर यांनी त्याला गावातून दूर नेले. ही बाब असे दर्शविते की, आरोपी विवाह करण्याच्या अस्सल हेतूने कदाचित प्रेरित झालेला असावा, जे त्याच्या कुटुंबातील वडिलधाऱ्यांद्वारे टाकण्यात आलेल्या दबावाच्या खातर पूर्ण होऊ शकले नव्हते. ते, विवाहाचे खोट्या वचनाचे एक प्रकरण असण्याऐवजी, विवाहाच्या वचनाच्या भंगाचे एक प्रकरण असल्यांचे, दिसून येते. या बाबतीतसुद्धा, उदय प्रकरणातील परिच्छेद २४ मधील या न्यायालयाची निरीक्षणे ही अपीलकर्त्याला सहाय्य करतात".

१८. **दिपक गुलाटी विरुद्ध हरयाणा राज्य, (२०१३) ७ एससीसी ६७५,** या प्रकरणामध्ये, न्यायालयाने बलात्कार आणि सहमतीपूर्वक समागम , या दोहोंमधील, वेगळेपण दर्शविलेले आहे. हे घटनेच्या वेळी १९ वर्ष वयाच्या फिर्यादी स्त्रीचे प्रकरण आहे.

तिला आरोपीबाबत उत्कटता होती. आरोपी तिला अशा तथ्याची आश्वासने देत असायचा की, तो तिच्यासोबत विवाह करेल. फिर्यादी स्त्रीने त्यामुळे त्याच्यासोबत विवाह करण्यासाठी स्वेच्छापूर्वक व स्वतःच्या मुक्त मर्जीने तिचे घर सोडले. तिने आरोपीला, त्याच्याद्वारे तिला देण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकावर, त्याला अशी विचारणा करण्यासाठी की त्यांनी अगोदर ठरविलेल्या ठिकाणी तो तिला का भेटला नाही, संपर्क साधला. तिने बराच वेळ त्याची वाट पाहिली आणि जेव्हा तो अंतिमतः आला, ती त्याच्यासोबत कर्ण सरोवर नावाच्या ठिकाणी गेली जेथे त्यांनी लैंगिक समागम केला. तिने त्या टप्प्यावर कोणताही आक्षेप उपस्थित केला नाही आणि कोणाकडे तक्रार केली नाही. त्यानंतर, ती आरोपीसोबत कुरुक्षेत्र येथे गेली, जेथे ती त्याच्या नातेवाईकांसोबत राहिली. येथे सुद्धा फिर्यादी स्त्रीने, आरोपी सोबत स्वेच्छापूर्वक जवळीक साधली. ती त्यानंतर,काही कारणास्तव, कुरुक्षेत्र विद्यापीठातील वसतिगृहात बेकायदेशीरपणे राहण्यास गेली, आणि पुन्हा एकदा तेथील बिर्ला मंदिरात आरोपीसोबत संपर्कात आली. त्यानंतर, अंबाला येथील न्यायालयात जेणेकरुन ते दोघे विवाहबद्ध होऊ शकतील या उद्देशाने, ती आरोपींसोबत अंबालाला जाण्यासाठी कुरुक्षेत्र येथील जुन्या बसस्थानकावर गेली. बसस्थानकावर, आरोपीला पोलिसांद्वारे अटक करण्यात आली. न्यायालयाने असे नमूद केले की, ती अनेक दिवसांपासून आरोपीसोबत राहत होती आणि तिने त्याच्यासोबत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास केला, असे तथ्य असतानासुद्धा, कोणत्याही विरोधाचे प्रकरण नव्हते किंवा

तिने कुठेही कोणतीही तक्रार कोणत्याही वेळी उपस्थित केलेली नव्हती, या कारणामुळे, दोन्ही पक्षकारांमधील शारीरिक संबंध हे फिर्यादी स्त्रीच्या संमतीने स्पष्टपणे विकसित झालेले होते. न्यायालयाने पुढे असे नमूद केले की, ज्यामध्ये आरोपीवर फसवणुकीचा/बलात्काराचा दोषारोप करणे शक्य होईल अशा परिस्थितींचा अंदाज बांधणे, शक्य नाही.

१९. नुकतेच, या न्यायालयाने, **शिवशंकर उर्फ शिवा विरुद्ध कर्नाटक राज्य व अन्य,** या प्रकरणामध्ये, दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजी निकाली काढण्यात आलेल्या फौजदारी अपील क्रमांक ५०४/२०१८ मध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की, जे आठ वर्षे सुरू राहिलेले आहे अशा नातेसंबंधादरम्यानचा लैंगिक समागम हा 'बलात्कार' म्हणून नमूद करणे कठीण आहे, विशेषत:, तक्रारदाराच्या स्वतःच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर की ते पती व पत्नी म्हणून एकत्र राहिले. खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले :

> " प्रस्तुत प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती पाहता, अपीलकर्ता, ज्याने, तक्रारदाराला एखादे खोटे वचन कदाचित दिलेले असावे, त्याच्याविरोधात लावण्यात आलेले आरोप कायम करणे कठीण आहे. जे आठ वर्षे सुरू राहिलेले आहे अशा नातेसंबंधादरम्यानचा लैंगिक समागम हा 'बलात्कार' म्हणून नमूद करणे मात्र कठीण आहे, विशेषत:, तक्रारदाराच्या स्वतःच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर की, ते पती व पत्नी म्हणून एकत्र राहिले."

२०. अशा प्रकारे, बलात्कार आणि सहमतीपूर्वक समागम या दोहोंमध्ये स्पष्ट भिन्नत्त्व आहे. न्यायालयाने, अशा प्रकरणांमध्ये फार काळजीपूर्वक तपासणे अत्यावश्यक आहे की, तक्रारदाराला पीडितेशी प्रत्यक्षात विवाह करायचा होता की त्याचा अप्रामाणिक असा प्रेरक हेतू होता आणि आपली वासना पूर्ण करणे या परिणामामध्ये केवळ त्याने खोटे वचन दिलेले होते, कारण नंतरची बाब ही, ठकवणूक किंवा फसवणूक या बाबीच्या कक्षेत येते. वचनाचा निव्वळ भंग आणि खोटे वचन पूर्ण न करणे या दोहोंत सुद्धा भिन्नत्त्व आहे. आरोपीने जर फिर्यादी स्त्रीला लैंगिक कृत्यामध्ये सहभागी होण्यासाठी फूस लावण्याच्या एकमेव हेतूने वचन दिलेले नसेल तर, असे एखादे कृत्य हे बलात्कार होणार नाही. असे एखादे प्रकरण असू शकते जेथे, फिर्यादी स्त्री ही आरोपीप्रती असलेले तिचे प्रेम आणि उत्कटता यामध्ये आरोपीने निर्माण केलेल्या गैरसमजुतीखातर एकमेवरित्या नव्हे, लैंगिक समागम करण्यास तयार होते किंवा जेथे आरोपी हा, ज्यांचा त्याला अंदाज येऊ शकला नव्हता किंवा ज्या त्याच्या नियंत्रणाबाहेरील होत्या अशा परिस्थितींमुळे तिच्यासोबत विवाह करण्यास, तसे करण्यास त्याचा प्रत्येक हेतू असतांनासुद्धा, अक्षम होता. अशा प्रकरणांना वेगळ्या प्रकारेच हाताळले पाहिजे. जर तक्रारदाराचा काही अप्रामाणिक हेतू होता आणि जर त्याचे छुपे प्रेरक हेतू होते तर, ते बलात्काराचे स्पष्ट प्रकरण आहे. दोन्ही पक्षकारांदरम्यानचे मान्य करण्यात आलेले सहमतीपूर्वक शारीरिक संबंध हे भादंसं कलम ३७६ अन्वये गुन्हा ठरत नाही.

२१. प्रस्तुत प्रकरणात, ही स्वीकृत स्थिती आहे की, अपीलकर्ता हा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होता आणि तक्रारदार ही त्याच आरोग्य केंद्रात सहाय्यक परिचारिका म्हणून कार्यरत होती आणि ती एक विधवा आहे. तिने असा आरोप केला आहे की, अपीलकर्त्याने तिला अशी माहिती दिली की, तो एक विवाहित पुरुष आहे आणि त्याचे त्याच्या पत्नीशी मतभेद आहेत. स्वीकृतपणे, ते वेगवेगळ्या समाजाचे आहेत. असेही नमूद करण्यात आले आहे की, आरोपीला/अपीलकर्त्याला त्यांच्या विवाहाची नोंदणी करून घेण्याकरिता, एका महिन्याच्या वेळेची आवश्यकता होती. तक्रारदार पुढे असे नमूद करते की, ती अपीलकर्त्याच्या प्रेमात पडली होती आणि ती विधवा असल्याने तिला साथीदाराची आवश्यकता होती. तिने विनिर्दिष्टपणे नमूद केलेले आहे की, " मी सुद्धा एक विधवा होती आणि मला एका साथीदाराची आवश्यकता होती, या कारणाने मी त्याच्या प्रस्तावाला सहमती दिली आणि तेव्हापासून आम्हा दोघांचे प्रेम-प्रकरण सुरु झाले आणि त्यांनुसार आम्ही एकत्र राहायला सुरुवात केली . आम्ही, कधी माझ्या निवासस्थानी तर कधी त्याच्या घरी राहायचो." अशाप्रकारे, ते कधी तिच्या घरी तर कधी अपीलकर्त्याच्या घरी असे एकत्र राहत होते. ते, बऱ्याच काळापासून एकमेकांशी नातेसंबंध ठेवून होते आणि त्यांनी एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेतला. हे देखील स्पष्ट आहे की, ते बऱ्याच काळाकरिता एक प्रकारे एकत्र राहत होते. जेव्हा तिला असे समजले की, अपीलकर्त्याने इतर कुणा महिलेशी विवाह केलेला होता, तेव्हा, तिने तक्रार दाखल

केली. तिचे असे काही म्हणणे नाही की, अपीलकर्त्याने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केलेला आहे. तिने, ज्या घडलेल्या होत्या अशा घडामोडींवर बुद्धीचा सक्रीय वापर करून जाणीवपूर्वक निर्णय घेतलेला होता. कुठलाही मानसिक दबाव टाकण्यात आल्याच्या परिस्थितीत एक निष्क्रिय शरणागती पत्करण्याचे हे एखादे प्रकरण नाही, तेथे एक मूक संमती होती आणि तिच्याद्वारे देण्यात आलेली मूक संमती ही तिच्या मनात निर्माण झालेल्या गैरसमजुतीचा परिणाम नव्हती. आम्ही या मताचे आहोत की, जरी तक्रारीत करण्यात आलेले आरोप त्यांच्या दृश्य मूल्यावर घेण्यात आले आणि त्यांच्या पूर्णतेत स्वीकारण्यात आले तरीही ते, अपीलकर्त्याविरोधात, कोणतेही प्रकरण सिद्ध करत नाहीत. आम्ही या दृष्टिकोनाचे सुद्धा आहोत की, तक्रारदार ही बलात्कार झाल्याचे प्रथमदर्शनी दर्शविण्यात अपयशी ठरलेली आहे, या कारणाने, कलम ३७६(२)(बी) अंतर्गत दाखल केलेली तक्रार, विचार करण्यायोग्य नाही.

२२. शिवाय, एफआयआर/प्रमाअ हा, भादंसं कलम ४२० किंवा अजा/अज अधिनियमाचे कलम ३(१)(एक्स) अंतर्गत अपीलकर्त्याद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही चुकीच्या कृत्याचा, कुठेही उल्लेख करीत नाही. म्हणूनच, उच्च न्यायालय हे, फौ.प्र.सं कलम ४८२ अंतर्गत अपीलकर्त्याद्वारे दाखल करण्यात आलेल्या याचिकेला नामंजूर करण्यात न्याय्य नव्हते.

२३. परिणामांती, अपील यशस्वी होते आणि त्यानुसार मान्य करण्यात आले

आहे. उच्च न्यायालयाचा, फौजदारी अर्ज क्र. ३५९०/२०१२ मधील, दिनांक ०२.०७.२०१८ रोजीचा आक्षेपित आदेश याद्वारे रद्दबातल करण्यात आला आहे. म्हसवड, जिल्हा नंदुरबार येथील पोलीस ठाण्यात, तक्रारदाराद्वारे दाखल करण्यात आलेला दिनांक ६.१२.२००० रोजीचा प्रथम खबर/माहिती अहवाल, ज्याच्या आधारे अपीलकर्त्याविरोधात गुन्हा क्र.५९/२००० ची नोंद घेण्यात आली, दाखल आहे तो याद्वारे रद्दबातल करण्यात आला आहे. भादंसं कलम ३७६(२)(बी), ४२० सह कलम ३४ तसेच अजा/अज अधिनियम चे कलम ३(१)(एक्स) अन्वये असलेल्या गुन्ह्यांसाठी, म्हसवड पोलिस ठाणे, द्वारे दाखल करण्यात आलेले दिनांक १४.०६.२००१ रोजीचे दोषारोपपत्र सुद्धा रद्दबातल करण्यात आले आहे.

अपील मंजूर करण्यात आले आहे.

-:अस्वीकरण:-

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील ह्या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करीता वैध मानला जाईल.

-X-X-X-X-X-